**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २२/२०१८-१९/७९७ दिनांक: २३.०८.२०१८
23/08/2018

**आदेश**

**आदेश केस क्र. २२(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | श्री शशीकांत शिवराम मगदुम<br>मु.पो. सावली बंगला शिवाजी शाखेजवळ<br>संभा तालीम चौक, ब्राम्हणपूरी, मिरज<br>ता. मिरज जि. सांगली | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>सांगली ग्रामिण | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग मिरज ग्रामिण एक | |

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री.डी.एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदींनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रार अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेशाने व्यथित होऊन तक्रारदार , श्री शशिकांत शिवराम मगदूम रा. ब्राम्हणपूरी मिरज ता. मिरज जि. सांगली यांनी या मंचाकडे दाखल केली आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

तक्रारदार श्री शशिकांत शिवराम मगदूम स्वतः उपस्थित होते. तक्रारदाराची थोडक्यात हकीकत अशी की, नोव्हेंबर २०१७ साठी म्हणून जे पहिले बिल पाठविण्यात आले ते मिटर वाचन न करता देण्यात आले आहे.

त्यानंतर डिसेंबर २०१७ , जानेवारी २०१८ या महिन्यासाठी बिले दिली गेली नाहीत. त्याबाबत अर्जदाराने विचारण केली असता मिटर रिडरकडून रिडींग मिळाले नाही म्हणून बिल आले नाही पुढच्या महिन्यात येईल असे सांगण्यात आले. त्यानंतर फेब्रुवारी २०१८ या महिन्यासाठी बिल देण्यात आले. त्यामध्ये विज वापर ८२४४ इतका दाखविण्यात आला. सदरचा दर्शविलेला विज वापर चुकीचा, अवास्तव व अयोग्य व अर्जदारच्या प्रत्यक्ष विज वापरापेक्षा कितीतरी अधिक आहे. सदरचे बिल हे ३ महिन्याचे बिल धरले तरी सुध्दा दरमहाचा विज वापर हा २७४८ एवढा येतो. अर्जदाराकडे पूर्वी असलेल्या ५९ अश्वशक्ती विज कनेक्शनसाठी विज वापर २७४८ युनिटस प्रतिमाह एवढा नव्हता .त्यामुळे सध्याच्या कनेक्शनचा विज वापर २७४८ युनिटस प्रतिमाह एवढा असणे शक्य नाही.प्रत्येक मिटर बसवताना त्याचे सुरवातीचे रिडींग १ असतेच नाही आणि तक्रारदाराची मुख्य तक्रार तीच आहे. जो नविन मिटर आता बसविला आहे त्याचे सुरुवातीचे रिडींग जाबदारच्याच म्हणण्यानुसार ८४४ एवढे आहे.वि.वि.कंपनीचे मिटर रिडर्स वेळच्यावेळी मिटर रिडींग करीत नाहीत व त्यामुळेच तक्रारी उपस्थित होतात मात्र जाबदार त्याबाबत आवश्यक ती उपाय योजना करीत नाही व त्या चूकांचा भुर्दंड ग्राहकावर लादला जातो.मार्च, एप्रिल व मे-२०१८ हया वाद नसलेल्या काळातील ग्राहकांचा एकूण विज वापर पाहिल्यास तो ( १४०४ + ५७२ + १०९६ = ३०७२ ) एवढा आहे म्हणजेच ग्राहकांचा मासिक सरासरी वापर १०२४ युनिटस प्रती माह एवढाच आहे व तो ग्राहकांचा तक्रार अर्जातील मागणीशी सुसंगत आहे व तीच ग्राहकांची मागणी आहे तक्रारदाराच्या वापरानुसार बिल भरण्याबाबत ग्राहकांचा कधीही तक्रार नाही मात्र चुकीचा वापर दर्शवून दिलेल्या अयोग्य बिलाबाबत तक्रारदाराची तक्रार आहे.

**वि.प. कंपनीची भूमिका**

वि.प. कंपनीतर्फे श्री सुधीर उ केळकर उपकार्यकारी अभियंता उपविभाग मिरज ग्रामिण एक यांनी उपस्थित राहून खालील प्रमाणे कथन केले.

१) श्री शशिकांत शिवराम मगदुम(मिरज व्ह्यू फर्म्स प्रा.लि) ग्राहक क्र. २७९९७२०५३२४१ यांनी दिनांक १२.१०.२०१७ रोजी व्यापारी स्वरुपाचे ९.९७ KW भाराचे वीज कनेक्शन घेतले आहे.

२) सदर ग्राहकास दिनांक १२.१०.२०१७ रोजी वीज जोडणी देतेवेळी जिनस कंपनीचा मिटर क्र. ३३८९०९३ हा मिटर सुरवातीचे रिडीग (I.T.) १ KWH असताना बसविण्यात आला आहे. शाखा अधिकारी सुभाषनगर यांच्या मिटर रिप्लेसमेंट नोदवहीची प्रत सोबत जोडत आहोत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

३) सदर ग्राहकाचे प्रथम वीज देयक नोव्हेंबर २०१७ पासून सुरु आहे. परंतु ग्राहकास प्रत्यक्ष वीज जोडणी ही दिनांक १२.१०.२०१७ रोजी पासून देणेत आलेली आहे. सदरचा ग्राहक हा आरसी पीसी मध्ये असलेने प्रथमचे बिल म्हणजे नाव्हेंबर २०१७ व डिसेंबर २०१७ चे वीज देयक नवीन कनेक्शन असल्याने RNA/RNT प्रमाणे सरासरी निघाले असून माहे जानेवारी २०१८ चे वीज देयक मिटर रिडर कडून चुकीचे व कमी टाकल्यामुळे १०० युनिटचे बिल आकारण्यात आलेली आहे. याबाबत मिटर रिडींग एजन्सीला याबाबत लेखी विचारणा करण्यात आलेली आहे. त्याची प्रत सोबत जोडत आहोत. माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये मिटर रिडरने जागेवरील रिडींग ८३४४ Kwh बरोबर घेतल्याने ग्राहकास ८२४४ युनिटचे देयक देणेत आले आहे.

४) सदर ग्राहकास वीज पुरवठा हा दिनांक १२.१०.२०१७ रोजी देणेयात आल्याने व कनेक्शन नवीन असल्यामुळे सुरवातीचे तीन महिने रिडींग न झाल्यामुळे फेब्रुवारी २०१८ मधील वीज देयकातील एकूण ८२४४ युनिट हे पुरवठा दिनांक १२.१०.२०१७ पासूनचे आहेत. म्हणजेच एकूण ५ महिन्याचे आहे. याचा अर्थ सदर ग्राहकाचा सरासरी वापर १६१८.८० प्रति महिना झाला आहे हे स्पष्ट होत आहे. सदर ग्राहकाच्या म्हणण्यानुसार सदरचा वापर बरोबर आहे. त्या प्रमाणे सदर ग्राहकास माहे फेब्रुवारी २०१८ चे वीज देयक नोव्हेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत विभागून ऑनलाईन बिल रिव्हीजन प्रणाली द्वारे दुरुस्त करुन रु. ६,७९९.२२ इतकी रक्कम माहे मार्च-२०१८ च्या बिलात समायोजित करण्यात आली आहे.

५) सदर ग्राहकाचा वीज जोडणी पासून ते माहे जानेवारी २०१८ पर्यन्त बिल मिळत नसल्याचे कोणतेही तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले नाही. तसेच सदर ग्राहकास फेब्रुवारी २०१८ चे बिल दिले नंतर त्याच्या तोंडी तक्रारीनुसार सदर मिटर चाचणी केले असून चाचणी अहवाल मिटर एररला ओके आहे असा या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर अहवालाची प्रत सोबत जोडत आहोत.

६) सदरचा मिटर थ्री फेज असल्यामुळे या उपविभागातील सहाय्यक अभिंयता (गुण नियंत्रक) AE(QC ) यांनी सदर मिटरचा MRI मशीनद्वारे बिलींग डेटा रिपोर्ट काढला असून माहे नोव्हेंबर २०१७ ते १ मार्च-२०१८ या सहा महिन्यामध्ये सदर ग्राहकाने सरासरी Max. Demad २०KVA व १७.२८Kwh वापर केल्याची नोंद मिटर मध्ये झाली आहे. त्याचा अहवाल सोबत जोडला आहे. यावरुन सदर ग्राहकाने मागणी केल्याचा लोड (९.९७KW) पेक्षा जास्त वापर करीत आहे हे स्पष्ट होत आहे.

७) सदर ग्राहकास सदरचा जुना मिटर क्र. ३३८९०९३ चाचणीला पाठविण्यासाठी माहे मे-२०१८ मध्ये काढून त्या ठिकाणी एल ॲन्ड टी कंपनीचा मिटर क्र. १४४३१८४ हा मिटर दिनांक १०.०५.२०१८रोजी सुरवातीचे रिडींग (I.R.) ८४४ Kwh असताना बसविण्यात आला आहे नवीन मिटर नुसार ग्राहकास माहे मे-२०१८ मध्ये मागील रिडींग दिनांक १०.०५.२०१८ ८४४ Kwh व चालू रिडींग दिनांक २५.०५.२०१८ १९४० Kwh असे एकूण १०९६ युनिटचे देण्यात आले यावरुन स्पष्ट होते की, सदर ग्राहकाचा माहे मे-२०१८ चा एकूण वापर हा १६ दिवसाचा असून त्यांचा (१०९६/४६= ६८.५०)x ३० = २०५५) सरासरी ६८.५० प्रती दिन व २०५५ प्रतिमहा वापर होत आह. सदर ग्राहकाचे जुन्या मिटरचे माहे नोव्हेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीतील वापर एकूण ८३४४ युनिटचे असून दुरुस्त करताना दरमहा विभागून दिले असता सरासरी वापर२०८६ युनिटप्रमाणे देण्यात आले आहे व ते बरोबर आहे.

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

८) सदर ग्राहकाने दिनांक २७.०३.२०१८ रोजी माहे फेब्रुवारी २०१८ चे वीज देयक खूप जादा आल्यामुळे मा. कार्यकारी अभियंता तथा अध्यक्ष अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, विश्रामबाग सांगली येथे तक्रार अर्ज करुन थकबाकी रु. १,०१,४४०/- मधील रु. ४०,०००/- चा भरणा अंडर प्रोटेस्ट रक्कम दिनांक २८.०३.२०१८ पावती क्र. ७७७४५४८ ने केला आहे.

९) मा. कार्यकारी अभियंता तथा अध्यक्ष ग्राहक तक्रार निवारण कक्ष, विश्रामबाग सांगली यांच्या आदेशानुसार व त्यापूर्वी सदर ग्राहकास माहे नोव्हेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ अखेर बसविलेल्या मिटरची व रिडींग बाबतची सर्व माहिती ग्राहकास देण्यात आलेली आहे.

वरील मुद्दा क्र.५,६,७,८ नुसार सदर ग्राहकाचा झालेला वापर हा योग्य असल्याचे स्पष्ट होत असून ग्राहकास दुरुस्त करुन देण्यात आलेले वीज देयक कंपनीच्या नियमाप्रमाणे बरोबर आहे.

सदर ग्राहकाने दुरुस्ती रक्कम रु. १,०१,४४०/- भरणेची अंतीम तारीख १७.०३.२०१८ होती परंतु मार्च २०१८ अखेर भरणेची तयारी शाखा अधिकारी सुभानगर व उपकार्यकारी अभियता ,मिरज ग्रामिण यांना दर्शविली होती व मंजूरी ही देणेत आली होती. पुन्हा सदर ग्राहकाने मिटर बसविताना सुरवातीच्या रिडींग बद्दल शंका उपस्थित केली तसेच माझा लोड व वापर नसल्याची शंका उपस्थित केली वेळोवेळी सर्व शंका निरसन करुन देखिल थकबाकी रक्कम व चालू बिलाची रक्कम भरण्या ऐवजी नवनवीन कारणे उपस्थित करुन सदर ग्राहक सदर रक्कम भरणेस टाळाटाळ करीत असून कंपनीची दिशाभूल करीत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

उभयपक्षाचे युक्तीवाद ऐकण्यात आले व त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे वाचण्यात आली. वरील सर्व विवेचना वरुन या मंचाचे निष्कर्षाकरिता खालील प्रश्न उपस्थित होतात.

१) तक्रारदारयांचे फेब्रुवारी २०१८ या महिन्याचे ८२४४ युनिटस चे वीज देयक चुकीच्या आकारणीने दिले गेली काय?

उत्तर:- अंशतः होय

२) अंतिम आदेश

उत्तर:-शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## **कारणमिमांसा**

तक्रारदार श्री शशिकांत शिवराम मगदूम (मिरज व्हयू फर्म्स प्रा.लि. ) हे वि.प. कंपनीचे व्यापारी वर्गातील विज ग्राहक आहेत. त्याचा विद्युत भार ९.९७ Kw इतका आहे त्यांची विज जोडणी दिनांक १२.१०.२०१७ रोजी झाली आहे. त्यांना जिनस कंपनीचे ३३८९०९३ हया क्रमांकाचे ३ ph मिटर बसविलेले आहे. त्यांचा नविन विज ग्राहक क्र. २७९१७२०५३२४१ हा आहे.

तक्रारदाराला नविन कनेक्शन दिल्यानंतर माहे नोव्हेंबर २०१७ , डिसेंबर २०१७ , जानेवारी २०१८ चा महिन्याची बिले ही मिटर वाचन न करता अंदाजे सरासरी ने पाठविली आहेत ही बाब उभय पंक्षाना मान्य आहे.तक्रारदाराला माहे फेब्रुवारी २०१८ चे बिल ८२४४ युनिट्सचे पाठविण्यात आले आहेत ते तक्रारदारास मान्य नसल्यामुळे ही तक्रार उत्पन्न झाली आहे. तक्रारदाराचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, नविन विज कनेक्शन देतांना लावलेल्या मिटरच्या सुरवातीच्या नोंदी त्यांना कळविण्यात आल्या नाहीत. त्यामुळे माहे फेब्रुवारी-२०१८ चे बिल ८२४४ युनिटचे विद्युत बिल त्यांना मान्य नाही अशी त्यांची तक्रार आहे.

तक्रारदाराने बिलाबाबत तक्रार केल्यानंतर तक्रारदारास मार्च-२०१८ मध्ये समांतर मिटर लावण्यात आले व त्या मीटरमधील नोंदी घेण्यात आल्या. आणि त्या नोंदीनुसार विजेचा वापर गृहीत धरुन तक्रारदारास विज बिल देण्यात यावे अशी तक्रारदाराची मागणी आहे आणि ती भरण्यास ते तयार आहेत. Genus कंपनीचे मिटर क्र. ३३८९०९३ असलेले मिटर हे मुळात Faulty असल्याचे तक्रारदार हयांचे म्हणणे नाही. नवीन वीज पुरवठा चालू केल्यानंतर सुरुवातीचे मिटर वाचन तक्रारदारास देण्यात आलेले नव्हते अशी तक्रारदाराची तक्रार आहे आणि त्यामुळे ८२४४ युनिटचे बिल हे चूकीचे आहे अशी तक्रार ग्राहकांची आहे. वि.प. कंपनीने त्यामिटरचा चाचणी अहवाल दाखल केलेला आहे. मिटर योग्य असल्याबाबत उभय पक्षांचा काहीही आक्षेप नाही. मिटरचे सुरुवातीचे वाचन किती होते याबाबत वि.प.ने (मिटर रिप्लेसमेंट रजिस्टरच्या नोंदी घेतल्या त्या पृष्ठाची प्रत हया मंचासमोर दाखल केली. परंतु त्यामध् नोंद घेतल्या गेलेल्या तारखा अनुक्रमाने नूसन त्या वर खाली किंवा पुर्ननोंदणी घेंतल्याचे तक्रारदाराचे म्हणेणे आहे व त्या वाद नाही.

ही गोष्ट निर्विवाद आहे की, वि.प. कंपनीने मिटरचा Biling data report मंचासमोर केलेला आहे. त्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानानुसार Auto reset ही प्रणाली असून महिन्याच्या १ तारखेला ००.०० वाजता मिटर आपोआप Reset होत असून त्यावेळेस असलेल्या बिलींग संबंधी व इतर नोंदी आपोआप मिटरमध्ये Registered होतात. व अशा मागील सहा महिनच्या नोंदी त्यामध्ये Registered असतात. MRI प्रणालीद्वारे त्या नोंदी आपण मिळतात जरी मिटरच्या नोंदी मिटर रिडरने न घेता विज बिले दिल्या गेली तरी विज ग्राहकाचा मागील १ तारखेपासून पुढील १ तारखे पर्यन्तच्या विज वापराची आपोआप मिटर मध्ये नोंद होते व ती ग्राहकाच्या विज वा.परानुसार होत असते.

मा. आयोगाच्या Electricity Supply code And other conditions of supply ) Requlation २००५ मधील कलम १५.३.५ नुसार मिटरच्या नोंदी घेतल्या गेल्या नसल्यास त्याला मागील देयक चक्रातील विजेच्या वापराच्या घेतल्या नोंदीच्या आधारे अंदाजित देयकाची परिगणना करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात मिटरचा परिक्षण अहवाल दाखल केला असून त्यात मिटर योग्य असल्याचे म्हटले आहे व त्या विषयी तक्रारदाराचा काहीही आक्षेप नाही. आणि बिलींग रिपोर्ट नुसार तक्रारदाराने मागील सर्व महिन्यामध्ये त्यांचा मंजूर भार ९.९७ Kw असून देखिल त्यांनी विज भार अंदाजे २० Kw पर्यन्त वापरलेला आहे व बिलींग डेडा रिपोर्ट वरुन त्यांचे विज वापराची सरासरी १८९० units प्रतिमाह अशी दिसते. हे निर्विवाद सत्य आहे की, मिटर मध्ये काहीही दोष नाही त्यामुळे मिटर मध्ये झालेल्या नोंदीनुसार तक्रारदाराने विज वापर केलेला आहे व त्याला त्यांचे बिल देयक भरणे न्यायोचित ठरेल (त्याच बरोबर तक्रारदाराने दिनांक २८.०३.२०१८ रोजी भरणा केलेले ४०,०००/- ची units प्रमाणे येणा-या बिलातून वजा करावी व बाकी रक्कम ग्राहकाच्या सोयीनुसार सुलभ हप्त्यामध्ये भरुन घेण्यात यावी. )म्हणून आम्ही वरील प्रश्न क्र.१ चे उत्तर होय दिले आहे.

MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
महावितरण

618

सबब आम्ही खालील आदेश पारित करत आहोत.

## आदेश

१) प्रस्तुतची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदारास MRI रिपोर्टच्या आधारे सरासरी पूर्ण चार महिन्याच्या १८९० युनिट्स प्रतिमहच्या आधारे सुधारीत देयक देण्यात यावी व तसेच तक्रारदाराने दिनांक २८.०३.२०१८ रोजी भरणा केलेले रु. ४०,०००/- ची वजावट करुन उर्वरित रक्कम तक्रारदाराच्या सोयीनुसार सुलभ हप्त्यामध्ये भरुन घेण्यात यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण